# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१९/०५/२०१८
## दि.१८/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे २४५/१८,भादविक २७९,३०४(अ),४२७,मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | बबन आनेराव, वय ५० वर्षे,रा.मुळशी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात वाहन चालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/२०१८ रोजी रात्रौ ०१/४५ वा.चे सुमारास डीएसके टोयोटा शोरुम समोर मुंबई बेंगलोर हायवे रोड ओंकार ब्रीजजवळ बावधन,पुणे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा मुलगा निखील बबन आनेराव,वय २५ वर्षे,रा.गणपती मंदिरा शेजारी, बालेवाडीगांव मुळशी,पुणे व त्याचा मित्र असे मोटार सायकलवरुन जात असताना, अज्ञात वाहन चालकाने त्यांना जबर ठोस मारून, फिर्यादी यांच्या मुलाचा मित्र याला गंभीर जखमी करून, निखील आनेवार याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.के.आबनावे ८३२९४२७०८८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे १४०/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | आबेदा मंहम्मद शफी रेहमानी, वय २२ वर्षे,रा.वडगावशेरी,पुणे |
| **आरोपी** | एकनाथ पांडुरंग लोंढे,रा.सर्व्हे नं ५३/५८, सिध्दीविनायक कॉलनी,लक्ष्मीमाता मंदीराजवळ, साईनाथनगर, वडगावंशेरी,पुणे मुळगावं -मु.पो.करंज खेड,ता.कनड,जि. औरंगाबाद (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१८/०५/१८ रोजी १४/३० वा.चे सुमारास सर्व्हे नं.५३/५८, सिध्दीविनायक कॉलनी, लक्ष्मीमाता मंदीराजवळ, साईनाथनगर, वडगावंशेरी, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने, अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांची मुलगी नगमा महम्मद शफी रेहमानी,वय १६ महिने,रा.सदर हिस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जे.डी.खलाणे ९७६७१११११७ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | निगडी पो स्टे ३४६/१८,भादविक ३२३, ५०४, १४३, १४५, १४७, १४८, १४९ ५०६, आर्म ॲक्ट कलम ४(२५), महा. पो.अधि.क.३७(१)(३) सह १३५ |
| **फिर्यादी** | भरत थोरात,वय २५ वर्षे,रा.निगडी,पुणे |
| **आरोपी** | १)फिरोज डंके,रा.ओटास्किम,निगडी,पुणे २)हैदर शेख, रा. सदर ३)संदिप खैरनार, रा. सदर ४)शमीम शेख,रा.सदर ५)अल्ताफ शेख रा.सदर व इतर १० ते १२ इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०४/२०१८ रोजी रात्रौ ०१/३० वा.चे सुमारास जिवलग हौसींग सोसायटी, बिल्डींग नं. ०७ चे समोर, ओटास्किम, निगडी, पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी, यातील नमुद इसम फिरोज डंके, हैदर शेख, संदिप खैरनार, शमीम शेख, अल्ताफ शेख व इतर १० ते १२ यांनी बेकायदेशीर जमाव जमवून हातामध्ये लोखंडी कोयता, तलवारी घेवून, फिर्यादी यांना शिवीगाळ करून, फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी देवून इतर लोकांना मारहाण केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एस.सुर्यवंशी ९७६७८५११०० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | समर्थ पो स्टे ९६/१८,भादविक ४०८,४२०,४६७ |
| **फिर्यादी** | राजेश ठाकरे, वय ५१ वर्षे,रा.त्रिमुर्तीनगर,नागपुर |
| **आरोपी** | १)राधेशाम रामबुथ मिश्रा,वय ४० वर्षे,रा.ग्रामपंचायत कदमवाकवस्ती,लोणीकाळभोर,पुणे २)संजय प्रकाशचंद्र उपध्याय,वय ३४ वर्षे,रा.जनता वसाहत,लेन नं.९ पर्वती,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | मार्च २०१६ ते मार्च २०१८ चे कालावधीत रास्तापेठ येथील बैद्यनाथ आयुर्वेदिक स्टोअर्स,पुणे |
| **तपशिल** | वर नमुद केले कालावधी मध्ये फिर्यादी यांचे रास्तापेठ येथील बैद्यनाथ आयुर्वेदिक स्टोअर्स येथे काम करणारे यातील नमुद इसम यांनी मिळुन बैद्यनाथ आयुर्वेदिक स्टोअर्स मधील विक्री करण्यात आलेल्या मालातील मिळालेल्या पैशामधील अंदाजे ११ लाख ५६ हजार रुपये स्वतःचे फायदयाकरीता अप्रमाणीकपणे अपहार केला असुन अकाऊंटमध्ये खोट्या इंट्री केल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.आर.शिकलगार ९८२२१३७६९६ |

## दि.१९/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ३११/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | महेश हवीनाळे, वय २२ वर्षे,रा.कोंढवा बु//,पुणे |
| **आरोपी** | चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०५/२०१८ रोजी १९/३० वा.चे सुमारास गोकुळनगर, गल्ली नं.४ जवळील बस स्टॉप जवळ, कात्रज कोंढवा रोड,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे घरी जात असताना,नमुद इसमांनी त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांना कोयत्याचा धाक दाखवुन, फिर्यादी यांचे जवळील रोख रक्कम ७ हजार रुपये व एक मोबाईल असा एकुण १५ हजार रू. किमतीचे जबरदस्तीने काढुन घेवुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. शिंदे ९९२२९५५४७० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे ११९/१८,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | ज्ञानेश्वर जाधव, वय ५४ वर्षे,रा.सदाशिव पेठ,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१९/०५/२०१८ रोजी रात्रौ ०१/०० वा.ते सकाळी ०६/०० वा.चे दरम्यान फ्लॅट नं.७, ४ था मजला, १४३८/३९/४०, सदाशिव पेठ, खजिना विहीर चौक, एस.पीज बिर्याणी जवळ,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख रक्कम ७० हजार रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण ५ लाख ५५ हजार १००/-रु. किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. साकोरे ९९२३०६०५२९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**